मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील मा. न्यायमुर्ती व त्यांचे पती/पत्नी आणि त्यांचेवर अवलंबित त्यांचे कुटुंबीय यांना चष्मे/चष्मा खरेदीबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय :- क्र. एचसीटी ५२२०/प्र.क्र.४१/का. चार
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १० जुलै, २०२०.

संदर्भ :- शासन निर्णय, विधि व न्याय विभाग, समक्रमांक, दि. २६/०६/२०२० व शुद्धिपत्रक, दि. २९/०६/२०२०.

शासन निर्णय :-

संदर्भाधीन शासन निर्णय, विधि व न्याय विभाग, दि. २६/०६/२०२० व शासन शुद्धिपत्रक, विधि व न्याय विभाग, दि. २९/०६/२०२० सदर शासन निर्णयान्वये अधिक्रमित करण्यात येत आहेत.

२. आता मा. मुंबई उच्च न्यायालयाचे मा. न्यायमुर्ती व त्यांचे पती/पत्नी (Spouse) आणि मा. न्यायमुर्ती यांचेवर अवलंबित त्यांचे कुटुंबीय यांना एकत्रित किंवा स्वतंत्रपणे प्रती वर्षी रु . ५०,०००/- (रुपये अक्षरी पन्नास हजार फक्त) च्या कमाल मर्यादेत चष्मे/चष्मा विकत घेण्यास व त्यासाठी येणाऱ्या आवर्ती खर्चास सदर शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३. याप्रित्यर्थ होणारा खर्च हा "मागणी क्र. जे-१, २०१४ न्यायदान (००), १०२ उच्च न्यायालये (०१) (०१) न्यायाधीश (अनिवार्य) (२०१४ ००६५) १३ कार्यालयीन खर्च" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या त्या वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर खरेदी करतेवेळी शासनामार्फत वेळोवेळी विहीत करण्यात येणाऱ्या खरेदी धोरणाचे अनुपालन करण्यात यावे.

५. प्रस्तुत शासन निर्णय वित्त विभागाकडील अनौ. सं. क्र. ३००/२०२०/व्यय ५, दि. २४/०६/२०२० अन्वये प्राप्त त्या विभागाच्या सहमतीने तथा सक्षम प्राधिकाऱ्यांच्या दि . १०/०७/२०२० रोजीच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(signature) 10/7/2020
(योगेश आमेटा)
विधि सल्लागार-नि-सह सचिव, महाराष्ट्र शासन

2468 14/7/20

Reg. O.S.

प्रति,
महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई, मुंबई.
मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई, मुंबई.
प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई, मुंबई.

Reg. Mr. 14/7/20

Received on 15-7-2020
No. Reg (O.S.) 627 /2020
S.O. (Cer cell 3) Pay 'A'
Registrar, (O.S.)
High Court, Bombay.
15-7-2020

C:\Users\aviraj.more\Desktop\aviraj\प्र.क्र. ४१ of २०२० मा. न्यायमुर्ती यांना चष्मे पुरविणेबाबत.odt